परिपत्रक

अधिसूचना

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय,मुंबई ४०००३२.
दिनांक १.४.२०००

मुंबई विद्युत शुल्क अधिनियम,१९५८ -

क्र.इएलडी२०००/सीआर१०२२२(२)/ऊर्जा१.- मुंबई विद्युत शुल्क अधिनियम,१९५८ (१९५८चा मुंबई अधिनियम क्र.४०) याच्या कलम ५-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि यासंदर्भात त्यास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन आणि अधिसूचना क्र.इएलडी१०९६/सीआर २८६४(एक)/ऊर्जा२,दि.३०.१०.९६ हिचे अधिक्रमण करुन महाराष्ट्र शासन याव्दारे एप्रिल २०००या बिलींग महिन्यापासून संपूर्ण महाराष्ट्र राज्यात सहकार क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकाने अपारंपारिक पध्दतीने निर्माण केलेल्या वीजेचा वापर स्वतःच्या औद्योगिक कारणासाठी केल्यास अशा वीज वापरावर सदर अधिनियमाच्या अनुसूचीतील भाग-ग च्या स्तंभ ४ खालील विद्युत शुल्क भरण्यापासून सूट देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

प्र.बा.पाटील
उप सचिव(ऊर्जा)

प्रति,

व्यवस्थापक,शासकीय मुद्रणालय,चर्नी रोड,मुंबई.

यांना-विनंती करण्यांत येते की, सदर अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र भाग-४ ब मध्ये प्रसिध्द करुन २०० प्रती या विभागास पाठविण्याची कृपया व्यवस्था करावी.

(कै.द.भंडलकर)
कक्ष अधिकारी.

प्रत-१)प्रधान सचिव(वित्त),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई ३२
२)सचिव(उद्योग),उउकावि,मंत्रालय,मुंबई
३)मुख्य अभियंता(विद्युत),महाराष्ट्र शासन,साबांवि.,प्रशासकीय इमारत,३रा मजला,रामकृष्ण चेंबूरकर मार्ग,चेंबूर(पूर्व),मुंबई ७१.
४)विकास आयुक्त(उद्योग),उद्योग संचालनालय,मुंबई
५)महालेखापाल,महाराष्ट्र(१),मुंबई
६)महालेखापाल,महाराष्ट्र(२),नागपूर
७)अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई, ८)निवड नस्ती(ऊर्जा१)